
धुक्यांतून लाल ताऱ्याकडे
अनंत काणेकर

# धुक्यांतून लाल ताऱ्याकडे

—अनंत काणेकर

## धुक्यांतून लाल ताऱ्याकडे !

ता. २२ एप्रिल १९३७ रोजीं काँटे व्हर्डे ही बोट मुंबई बंदरांतून सायंकाळच्या संधिप्रकाशांत बाहेर पडली. त्या वेळीं तिच्यावरील उतारूंमध्यें बत्तिशीच्या सुमाराचा एक महाराष्ट्रीय तरुण होता. विलायतच्या बोटीवरील हिंदी प्रवाशांत शिक्षणासाठीं निघालेले गर्भश्रीमंत विद्यार्थी, धंद्यासाठीं चाललेले व्यापारी अथवा मजा करण्यास निघालेले राजेरजवाडे व त्यांचा परिवार असेच मुख्यत्वें आढळतात. पण हा तरुण त्यांपैकीं कोणत्याही यादींत मोडण्यासारखा नव्हता. त्याचा वेष साधाच, शरीरयष्टि सुटसुटीत, पण डोळ्यांत गांभीर्य व करारीपणा यांचें असें मजेदार मिश्रण खेळत होतें कीं, त्याला पहातांच इतर प्रवाशांना त्याची ओळख करून घेण्याची साहजिकच इच्छा होई.

हे गृहस्थ म्हणजे महाराष्ट्राचे एक आवडते लेखक अनंत काणेकर हे होत. काणेकर निघाले ते मजेखातर नसले तरी एवढें मात्र खरें कीं, त्यांना प्रवासाची संधि ताबडतोब आणून दिली गेली ती, अनेकांना मौज वाटण्यासारख्याच एका निमित्तानें. त्या वर्षाच्या मे महिन्यांत लंडन येथें बादशहा सहावे जॉर्ज यांचा राज्यारोहणसमारंभ होता; व या अपूर्व समारंभाला दूरदूरच्या प्रेक्षकांना हजर राहतां यावें, येवढ्यासाठीं बोटींच्या कंपन्यांनीं सवलतीचीं परतीचीं तिकिटें ठेवलीं होतीं. त्याचा लाभ करून घेण्याचें काणेकरांनीं मनांत आणलें.

त्याप्रमाणें काणेकर लंडनला गेले. पण पांच-पांच पौंड देऊन व बारा-बारा तास थंडीवाऱ्यांत कुडकुडत बसून मिरवणूक पहाण्याऐवजीं घरीं बसून त्यांनीं व त्यांच्या मित्रांनीं रेडिओवरच सर्व वर्णन ऐकलें. काणेकरांना याबद्दल कोणी अरसिक म्हणेल. पण वस्तुस्थिति अशी कीं, ते विलायतला गेले ते केवळ लंडन-पॅरिसची शोभा पहायला नव्हे, तर या निमित्तानें रशियाला जाण्यास मिळालें तर पहावें एवढ्यासाठीं. त्यांच्यासारख्या माणसाला पॅरिसचा बुलेवार्द किंवा लंडनचें पिक्याडेली सर्कस भुरळ पाडण्याजोगें नव्हतें. बार्मिंगहॅम-लिवर्पूलचे अवाढव्य कारखाने पहाण्यासहि ते मोठे उत्सुक नव्हते अथवा ऑक्सफर्ड-केंब्रिजचीं विश्वविद्यालयें त्यांना आकर्षित करीत नव्हतीं.

काणेकरांनाच काय, पण जगाच्या पाठीवरील कोणत्याहि पुरोगामी विचाराच्या तरुणास विचारलें कीं, "तुला कोणता देश पहाण्याची उत्कंठा आहे?" तर तो क्षणहि न थांबतां "रशिया" हेंच उत्तर देईल. गेल्या महायुद्धांत रशियांत क्रांति झाली व समतेच्या तत्त्वावर नव्या प्रकारची समाज-

# तात्पर्य

तसेंच कांहीं कारण असल्याशिवाय ललित-लेखकानें आपल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहूं नये, असें माझें मत आहे. त्याच्या लिखाणावरूनच त्याला जें कांहीं सांगावयाचें आहे तें त्याच्या वाचकांना समजलें पाहिजे. ज्या ललितकृतीचे लेखकाला खुलासे द्यावे लागतात, ती तितक्या प्रमाणांत अयशस्वी आहे हें आपोआपच सिद्ध होतें. मात्र या नियमाला एकदोन अपवाद आहेत. एक, ललितकृतीच्या निर्मितीच्या कालासंबंधीं स्पष्टीकरण करणें केव्हां केव्हां आवश्यक असतें. उदाहरणार्थ, एखाद्या लेखकाच्या कथा-संग्रहांतली एक गोष्ट त्याच्या वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलेली असेल, तर दुसरी पन्नासाव्या वर्षी लिहिलेली असेल. लेखनकालाचा खुलासा लेखकानें केला नाहीं तर वाचक किंवा टीकाकार त्या दोन गोष्टींची अन्याय्य तुलना करण्याचा संभव आहे. तेव्हां वाचकांची दिशाभूल होऊं नये म्हणून ललितकृतीच्या अंतरंगासंबंधीं नसले तरी, असले ऐतिहासिक खुलासे लेखकानें दिले पाहिजेत. दोन, प्रवासवृत्तासारखें लिखाण संपूर्णतया ललित-प्रकारांत पडत नाहीं; आणि वाचकांना प्रवासवर्णनाव्यतिरिक्त प्रवासासंबंधींच्या अनेक गोष्टी जाणण्याची खरोखरच उत्कंठा असते. तिचें थोडेंबहुत तरी समाधान लेखकानें करण्याचा प्रयत्न करावा. प्रवासाहून आल्यानंतर माझ्यावर उत्साही श्रोत्यांनीं आणि वाचकांनीं अनेक प्रश्नांचा मारा केला. त्यांच्यासाठींच हे चार शब्द लिहीत आहे.

प्रवासाच्या खर्चाचा पहिला प्रश्न. या सर्व प्रवासाला मला एकोणीसशें रुपये खर्च आला. रशिया वगळला असता तर हा खर्च आणखी चारशें रुपये कमी झाला असता. प्रवासासंबंधींच्या आणि इतर लिखाणावर मी एवढे पैसे उभे करूं शकलों. यावरून युरोपचा प्रवास करावयाला श्रीमंती हवीच असें नाहीं; मराठी लेखकही युरोपला जाऊन येऊं शकतो हें स्पष्ट होईल.

प्रश्न विचारणारे आणखी दोन जातींचे लोक होते. एक, उच्च विद्या काय ती सर्व परदेशांत आहे असें समजणारे न्यूनगंडानें ग्रस्त झालेले लोक; आणि दोन, परदेशाला जायचें म्हणजे परत आल्यावर पन्नासाचा पंचावन रुपये तरी पगार होईल अशी कांहीं तरी पदवी आणलीच पाहिजे अशी ठाम समजूत असलेले,—जगांतल्या सर्व गोष्टींची किंमत रुपये, आणे, पैमध्यें करणारे क्षुद्र मनोवृत्तीचे लोक. टिळक, राजवाडे, यांच्यासारखे, जागतिक विद्वानांच्या मांडीला हक्कानें मांडी लावून बसणारे महाराष्ट्रीय विद्वान् शिकण्यासाठीं कधींच परदेशीं गेले नव्हते, हें पहिल्या जातीचे हे लोक विसरतात; आणि आपण रहातों हें जग कितीही खर्च करून पाहिलें तरी कमीच, इतकें सुंदर आहे, हें दुसऱ्या जातीच्या लोकांच्या गांवींही नाहीं.

ज्यांना तात्पर्य पाहिजेच त्यांना मात्र मी तात्पर्य सांगूं शकतों. या प्रवासानें मला दोन धडे शिकवले. एक, पृथ्वी वाटोळी आहे. आणि दोन, माणुसकी सर्वत्र सारखीच आहे! लहानपणापासून क्रमिक पुस्तकात ज्या सामान्य गोष्टी आपण वाचतों त्या शिकण्याकरतां दहाबारा हजार मैलांचा प्रवास आणि कित्येक हजार रुपये खर्च मला करावा लागला, हे वाचून पुष्कळांना हंसूं कोसळेल. पण हंसण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. क्रमिक पुस्तकांच्या कागदावर मरून पडलेलीं आणि त्यामुळें सामान्य वाटणारीं हीं सत्यें प्रत्यक्ष अनुभवानें एकदम जिवंत होतात आणि मलतेंच जगड्व्याळ स्वरूप धारण करतात. म्हणूनच या अनुभवांकरतां करावा लागणारा खर्च आणि परिश्रम कांहींच नव्हेत असें मला वाटतें. मुंबईहून मी निघालों, आणि जगांतलीं अनेक सुंदर शहरें पाहिल्यानंतर मुंबईच मला अधिक सुंदर वाटली; आणि मी मुंबईलाच उत्कंठित अंतःकरणानें परत आलों. मुंबईहून निघालेला माणूस शेवटीं मुंबईलाच परत येतो, तेव्हां पृथ्वी वाटोळी नाहीं का!

आपले हिंदी लोक आपल्यासारखेच काळे, गरीब आणि म्हणून भले आहेत; जगांतल्या इतर लोकांच्या भलेपणाबद्दल काय सांगावें, असें साह-जिकच मला वाटे. पण आतां पोलंड म्हटलें, कीं उभ्याआडव्या रेघांचा नुसता नकाशा डोळ्यासमोर उभा रहात नाहीं; वार्सा-बर्लिन एक्सप्रेसमध्यें मध्यरात्रीं मोठ्या सौजन्यपूर्वक मला झोंपायला जागा करून देणारा तो मध्यमवयस्क पोल गृहस्थ माझ्या डोळ्यांसमोर उभा रहातो. अमेरिकेचें नांव निघालें, कीं

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे !

बाल्टिक ‘समुद्रांत तुम्ही उष्ण देशांतले आहांत, तुम्हांला ही थंडी सहन होणार नाहीं’ म्हणून आपल्या अंगांतलें लेदर जॅकेट माझ्या अंगावर चढव-णाऱ्या अमेरिकन मुलीची कृतज्ञतेनें आठवण होते. आणि बर्लिनविषयीं कुणी बोलूं लागला कीं क्रूरकर्मी हिटलर आणि त्याचे उग्र चेहऱ्यांचे जर्मन साथीदार डोळ्यांपुढें येत नाहींत, तर कॅफे कॉशविट्झमध्यें माझ्याजवळ उभा राहून आस्थापूर्वक मला खाण्यापिण्याचा आग्रह करणारा हर डायेट्रिच् मला दिसतो. हा दुसरा धडाही कमी मोलाचा आहे असें मला वाटत नाहीं. प्रवासाचे आणखी ‘नफेतोटे’ सांगतां येत नाहींत. पण उत्तर किंवा दक्षिण ध्रुवाकडल्या बर्फमय प्रदेशांत कसलीही विद्या मिळण्यासारखी नसली, किंवा पगारवाढ देणारी कुठलीही पदवी घेणें शक्य नसलें, तरी शक्य असेल तेव्हां केवळ तो रम्योदात्त देखावा पाहण्याकरतां म्हणून तिथेंही जाण्याची मला अजून बल-वत्तर इच्छा आहे.

ता. २४-२-४०

—अनंत काणेकर